# चाळीसगांव नगरपरिषद, चाळीसगांव जि.जळगांव

## Chalisgaon Municipal Council, Chalisgaon Dist.Jalgaon

☎ (०२५८९) २२३४१६ फॅक्स नं. ०२५८९-२२३३९७ ई.मेल-chalisgaonnp@gmail.com


जा.क्र.न.पा. / सामान्य/ २६२३/२०२२ दिनांक १५/११/२०२२

## जाहीर सूचना

चाळीसगांव नगरपरिषदेतील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणाकरिता खालील तज्ञ कर्मचाऱ्यांची पूर्णतः कंत्राटी तत्वावर ११ महिन्यासाठी आवश्यकता आहे. खालील नमुद केलेल्या कंत्राटी पद भरण्याकरिता दिनांक १६/११/२०२२ ते दिनांक २२/११/२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत चाळीसगांव नगरपरिषद कार्यालय येथे आवश्यक कागदपत्रासह अर्जदार यांनी अर्ज सादर करावेत. विहीत मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| अ. क्र. | पदांचे नांव | एकूण पदे | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | एकत्रित मासिक मानधन रूपये | अर्ज सादर करण्याची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शहर समन्वयक (City Co ordinator) | ०१ | **शैक्षणिक पात्रता**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठातील खालील कोणत्याही शाखेतील पदवी<br>अ.बी.ई./बी.टेक (कोणत्याही शाखा<br>ब.बी.आर्क<br>क.बी.प्लॅनिंग<br>ड. बी.एस्सी (कोणतीही शाखा)<br>**अनुभव**<br>१. स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे.<br>२. शहर समन्वयक म्हणून काम करण्याचा अनुभव<br>३.शहर समन्वयक व्यतिरिक्त स्वच्छ सर्वेक्षण / घनकचरा व्यवस्थापन/पर्यावरण विभागात काम करण्यांचा अनुभव | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल) | ४५०००/- (पंचेचाळीस हजार मात्र) प्रतिमाह | दि. १६/११/२२ ते दि.२२/११/२०२२ सायं. ५.०० वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) |

सदर कामासाठी आवश्यक अर्हता व अनुभव या आधारावर पात्र उमेदवारांना मुलाखतीकरिता पाचारण करण्यांत येईल. पात्र उमेदवारांची मुलाखत मा. सह. आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांच्या दालनात दिनांक २८/११/२०२२ रोजी (संभाव्य दिनांक) मुलाखत समितीसमोर घेण्यात येईल. अध्यक्षेतखाली असलेल्या समितीसमोर मुलाखतीकरीता मुळ कागदपत्रासह उपस्थित रहावे लागेल. कुठलेही कारण न देता. सदर प्रक्रियेत बदल करण्याचे किंवा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवलेले आहेत. भरती प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती चाळीसगांव नगरपरिषदेच्या सूचना फलकावर तसेच https://chalisgaonmahaulb.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

सही (प्रशांत ठोंबरे)
मुख्याधिकारी, नगरपरिषद, चाळीसगाव